# पारनेरमध्ये विशेष सहाय्य योजनेत १४८४ लाभार्थी अपात्र

## शासनाचे महिन्याला १४ लाख ८४ हजारांची बचत

**अहमदनगर प्रतिनिधी –**
पारनेर तालुक्यात सामाजिक अंकेक्षण मोहीमेंतर्गत विशेष सहाय्य योजनेत १४८४ लाभार्थी अपात्र आढळून आले आहेत. या लाभार्थ्यांचे जुलै २०२२ पासून मानधन बंद करण्यात आले आहे. यामुळे शासनाचे दर महिन्याला १४ लाख ८४ हजार रूपयांची बचत झाली आहे. अशी माहिती पारनेरचे तहसीलदार शिवकुमार आवळकंठे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

विशेष सहाय्य योजनेअंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची पात्रता तपासणी वर्षातून एकदा करण्यात येते. विशेष सहाय्य योजना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन, संजय गांधी निराधार अनुदान व इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेसाठी पारनेर तालुक्यात लाभार्थी अपात्र मोहीम राबविण्यात आली. या योजनांच्या लाभार्थींच्या गावनिहाय यादया तलाठ्यांकडे तपासणीसाठी उपलब्ध करून देणेत आल्या. सामाजिक अंकेक्षण मोहीमेंतर्गत १ मे २०२२ व १५ ऑगस्ट २०२२ रोजीचे ग्रामसभेत तलाठी यांचेमार्फत या याद्यांचे वाचन करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत देखील लाभार्थी पडताळणी साठी आवाहन करण्यात आले होते. गटविकास अधिकाऱ्यांमार्फत मागील दहा वर्षात मयत पावलेल्या व्यक्तींच्या गावनिहाय यादया उपलब्ध करून घेण्यात आल्या. यानुसार पारनेर तालुक्यातील एकूण ७८ गावातील १४८४ मयत तसेच अपात्र लाभार्थ्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेत १०५७ (यापैकी मयत – ८१६, लाभार्थीचे मुले शासकीय सेवेत –२४, ६५ वर्षापेक्षा कमी वय अपात्र लाभार्थी – २१७), संजय गांधी निराधार अनुदान योजनेत १६४ (यापैकी मयत – ७, लाभार्थीच्या मुलाचे वय २५ वर्षापेक्षा जास्त अपात्र लाभार्थी – १५७) आणि इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेत सर्वच्या सर्व २६३ मयत लाभार्थ्यांना जुलै २०२२ पासून अनुदानासाठी अपात्र करण्यात आले आहे. विशेष सहाय्य योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांची मुले शासकीय सेवेत, खासगी नोकरीत असल्यास किंवा इतर कोणताही शासकीय लाभ घेत असल्यास अशा लाभार्थ्यांनी स्वत:हून दर महिन्याचे मानधन घेणे बंद करावे. असे आवाहन ही तहसीलदार शिवकुमार आवळकंठे केले आहे.

# केंद्र सरकारने सहकाराचे कायदे चुकीचे केले आहेत –पवार




श्रीगोंदा प्रतिनिधी :- देशाचे माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांचा आज श्रीगोंदा दौरा होता त्यावेळी काष्ठी येथील एका पतसंस्थेचे उद्घाटन केल्यावर कोळगाव येथील रयत शिक्षण संस्थेचे कोळाईदेवी माध्यमिक विद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्घाटन प्रसंगी शरद पवार बोलताना म्हणाले की केंद्राने सहकाराचे कायदे केले आहेत ते चुकीचे आहेत असे त्यांनी सांगितले
श्रीगोंदा तालुक्यातील काष्ठी येथील महेश्वर पतसंस्था च्या नूतन इमारतीच्या लोकार्पण समारंभ प्रसंगी शरद पवार हे प्रमुख पाहुणे होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी घनश्याम शेलार हे होते त्यावेळी शरद पवार यांनी पतसंस्था हा ग्रामीण भागातील कणा आहे पतसंस्था मूळे सर्व सामान्य नागरिकांना आर्थिक पाठबळ मिळाले आहे असेही ते म्हणाले त्यानंतर तालुक्यातील कोळगाव या ठिकाणी कोळाईदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे लोकवर्गणीतून बांधण्यात आलेल्या नूतन इमारतीचे उद्घाटन प्रसंगी ते बोलताना म्हणाले की महाराष्ट्रात सोलापूर आणि अहमदनगर हे मोठे साखर उत्पादन जिल्हे आहेत त्यामुळे या दोन जिल्ह्याचा महाराष्ट्रात नंबर लागतो पण दरम्यान कालावधीत केंद्र सरकारने सहकार विषयक काही कायदे चुकीचे केले आहेत ते सुधारण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे ते पुढे बोलताना म्हणाले सहकारी चळवळीला बळकटी द्या सहकार चळवळ टिकवणे गरजेचे आहे सहकारी बँका पतसंस्था या गोरगरीब जनतेला अल्प दरात कर्ज मिळवून देतात तसे राष्ट्रीय कृत बँका देत नाहीत ते पुढे म्हणाले कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लावलेल्या रोपट्याचा आज कल्पवृक्ष झाला आहे त्यामुळे आज साताऱ्यात व अहमदनगर जिल्ह्यात सर्वाधिक शिक्षण संस्था आहेत या संस्थांमध्ये तब्बल चार लाख मुले शिक्षण घेत आहेत त्यातून मुलांना अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रयोगशाळा लवकर उपलब्ध करून दिल्या जातील तसेच परिसरातील लोकांनी अतिरिक्त वर्ग सुरू करण्याची मागणी केली आहे त्यांचा सर्वजण मिळून विचार करू असेही त्यांनी सांगितले

काष्ठी या ठिकाणी कार्यक्रमाला आमदार निलेश लंके,अशोक पवार, बबनराव पाचपुते, राहुल जगताप,रमेश थोरात,राजेंद्र नागवडे,दादाभाऊ कळमकर, बाळासाहेब नाहटा,काकासाहेब कोयटे, सुरेश वाबळे, आण्णासाहेब शेलार, बाबासाहेब भोस हे मान्यवर उपस्थित होते तर कोळगाव या ठिकाणी कार्यक्रमात हाऊसराव दांगडे, संग्राम जगताप, राजेंद्र नागवडे ,बाळासाहेब हराळ, दिलीप वळसे ,रयत शिक्षण संस्थेचे चेरमन अनिल पाटील,, हेमंत लगड,प्रतिभा पाचपुते,अमित लगड आदी मान्यवर उपस्थित होते.

**वाहतुकीची कोंडी ?**
काष्टीत कार्यक्रम ठिकाणी माजी केंद्रीय मंत्री तथा विद्यमान खासदार शरद पवार हे आल्यानंतर व जाताना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती मात्र पोलिसांच्या सतर्गतेमुळे वाहतूक कोंडी लवकर सुटली त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा विस्वास घेतला.

**काष्टीत नागरिकाचे हाल,गळका मंडप !**
काष्टीत पतसंस्था उद्घाटन ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने माजी केंद्रीय मंत्री शरद पवार येण्याच्या आगोदर आणि आल्यावर व्यासपीठ सोडता सर्व मंडप पावसामुळे गळत होता त्यामुळे नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गैरसोय झाल्याचे चित्र पाहण्यास मिळाले.

**राष्ट्रवादी च्या कार्यकर्त्यांना व्यासपीठावर रोखले,नाराजीचा सूर**
तालुक्यातील काष्ठी या ठिकाणी उद्घाटन कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेसच्या अनेक कार्यकर्त्यांना व्यासपीठावर जाण्यास पोलिसांनी मज्जाव केल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजीचा सूर उमटताना दिसत होते.

# सामाजिक व राजकीय संघटनांनी तीव्र आक्षेप

## पुण्यातील सेक्स तंत्र कार्यक्रम रद्द

**पुणे प्रतिनिधी –** सामाजिक व राजकीय संघटनांनी तीव्र आक्षेप नोंदवल्यानंतर सत्यम शिवम् सुंदरम् या फाउंडेशनने आजोजित केलेला 'सेक्स तंत्र' हा कार्यक्रम अखेर रद्द करण्यात आला आहे. उत्तर प्रदेशमधील या फाउंडेशनचे प्रमुख रवी सिंग यांच्याशी यासंदर्भात पोलिसांनी संपर्क साधला असल्याची माहिती आहे. गुन्हे शाखेच्या सामाजिक विभागाने देखील याची दखल घेतली आहे. नवरात्र उत्सावाच्या निमित्ताने तरुणांना लैंगिक प्रशिक्षणासाठी ऑनलाईन नावनोंदणी सुरू झाली आहे. त्याबाबत सोशल मीडियावर जाहिरातींचा मोठा मारा करण्यात आला. दोन दिवसिय निवासी शिबिरासाठी पंधरा हजार रुपये शुल्क असून त्याअंतर्गत निरनिराळी लैंगिक तंत्रांचे प्रशिक्षण देण्यात येणार असल्याचा दावा या जाहिरातीच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

ही जाहिरात सोशल मीडियावर व्हायरल झाल्यावर अनेक संघटनांनी यासंदर्भात तीव्र संताप व्यक्त केला. ' या विकृत शिबीराला नवरात्री स्पेशल असं नाव दिलं गेलं, हा हिंदूंचा आणि त्यांच्या दैवतांचा अपमान आहे. हे हिंदू महासंघ कदापि सहन करणार नाही, असा इशारा हिंदू महासंघाचे प्रमुख आनंद दवे यांनी दिला आहे.'या शिबीराच्या जाहिरातीत आयोजकांचा पत्ता, कार्यक्रमाचे ठिकाण आणि अन्य कोणतीही माहिती नाही. यावरूनच हे सर्व फसवे , घाणेरडे आणि एका विकृत संस्कृती ला जन्म देणारे ठरणार आहे आणि हिंदू महासंघ हे होऊ देणार नाही. आम्ही यासंदर्भात पोलिसांना निवेदन दिले आहे, असे दवे यांनी कळवले आहे. शहरातील अन्य अनेक संघटनांनी यासंदर्भात तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. ज्या आयोजकांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यांच्यावर कशाप्रकारे कारवाई करण्यात येईल याबाबत पहाणी चालू असल्याची माहिती सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कुंभार यांनी सांगितले.

# रिपाईचे अध्यक्ष गायकवाड यांचा शिवसेनेत जाहिर प्रवेश



नेवासा (प्रतिनिधी) - युनायटेड रिपब्लिकन पक्षाचे संस्थापक अध्यक्ष व नेवासा तालुक्याचे सुपूत्र दलित चळवळीतील जेष्ठनेते अशोकराव गायकवाड यांनी नुकताच मुंबई येथे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थित शिवसेनेत प्रवेश करुन शिवबंधन हाती बांधले.

अशोकराव गायकवाड यांनी यापुर्वी रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पार्टीचे राज्यसचिव व प्रवक्ते म्हणून जबाबदारी पार पाडलेली होती.त्यानंतर त्यांनी युनायटेड रिपब्लिकन पार्टीची स्थापना करुन नगर जिल्ह्यात संघटन केलेले आहे मात्र गायकवाड यांनी आता शिवसेना पक्षप्रमुख ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करुन युनायटेड रिपब्लिकन पक्षाचे संघटन शिवसेनेत विलेणीकरण केलेले आहे

शिवसेना पक्ष प्रवेशावेळी ठाकरे यांच्या बरोबर सविस्तर चर्चा करण्यात आलेली असून गायकवाड यांच्यावर महत्वाची जबाबदारी देण्याचे आश्वासनही यावेळी ठाकरे यांनी गायकवाड यांना दिले आहे.याप्रसंगी खासदार अरविंद सावंत,सुभाष देसाई,चंद्रकांत खैरे,मिलिंद नार्वेकर,संपर्कप्रमुख आमदार सुनिल शिंदे,नंदकुमार मोरे,शिवसेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी,पाथर्डी तालुकाप्रमुख भगवान दराडे आदी उपस्थित होते.

दरम्यान गायकवाड यांनी शिवसेनेत प्रवेश केल्यामुळे नेवासा तालुका शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांतून अभिनंदन केले जात आहे.

# उत्तर महाराष्ट्रात मान्सूनचा पाऊस सुरु होईल हवामान शास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांची माहिती

मुंबई प्रतिनिधी – सद्यस्थितीत पडणारा पाऊस हा आणखी चार महिने कोसळणार असून सप्टेंबर अखेर पाऊस आणखी वाढण्याचा इशारा हवामान शास्त्रज्ञांनी दिला आहे. महापूरांचा धोका कायम असून चार महिने मान्सून पुढे सरकला असल्याचा प्राथमिक परंतू अतिशय धक्कादायक निष्कर्ष त्यांनी काढला आहे. माहितीनुसार, ४ ऑक्टोबर नंतर निंबोस्ट्रेटस ढगांची निर्मिती प्रक्रीया वाढीस लागेल आणि उत्तर महाराष्ट्रात मान्सूनचा पाऊस सुरु होईल अशी माहिती हवामान शास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी दिली आहे.


KIRANKUMAR JOHARE

साधारणत: मान्सून ०१ जूनला सुरू होतो आणि तो ३० सप्टेंबरला सपतो. मात्र यावेळी जवळपास चार महिने मान्सून पुढे सरकला आहे. आगामी दसरा-दिवाळीचे सण मुसळधार पावसातच साजरे करावे लागतील, तसेच जानेवारी अखेर पर्यंत पाऊस बरसेल आणि फेब्रुवारीत देखील पाऊस दिसू शकेल, असा अंदाज जोहरे यांनी व्यक्त केला आहे. ऑक्टोबर मध्येही पावसाचे प्रमाण राहणार आहे. ऑक्टोबरनंतर पावसाच्या प्रमाणात आणखी वाढ होऊन पावसाळा जानेवारी पर्यंत लांबणार आहे. त्यामुळे यंदाचा पाऊस दिर्घकाळ आव्हाने देत ठाण मांडणार आहे. यंदा तब्बल जुलैत झालेला पाऊस सुर्यावरील चुंबकीय वादळांमुळे झाला. विशेष म्हणजे यावर्षी अद्याप एकही प्रबळ चक्रीवादळ तयार झालेले नाही ही देखील गंभीर बाब आहे. मान्सूनच्या बदललेल्या पॅटर्नच्या 'न्यू नॉर्मल'ला शेतक-यांनी व जनसामान्यांनी येत्या काळात घाबरून न जाता मान्सूनच्या नव्या पॅटर्नला स्वीकारावे लागेल, असे आवाहन त्यांनी केले आहे.

सद्यस्थितीत जिल्ह्यातील सर्वच धरणे तुडुंब भरलेली आहेत. भरलेल्या धरणांनी पुढच्या वर्षाचा पाणी प्रश्न सुटल्याचा आनंद व्यक्त होत असला तरी तब्बल डिसेंबर पर्यंत पडणारा मोठा पाऊस धरणे आणि बंधाऱ्यांसाठी धोक्याचा इशारा देणारा आहे. त्यामुळे सद्यस्थितीत आत्ताच धरणांचे आणि बंधाऱ्यांच्या पाण्याचे नियोजन करतांना त्यांची तपासणी व धरणांचे पाणी कमी करत आकाशातील व कचमेंट एरीयातील पाणी सामावण्यासाठी ३० ते ४० टक्के जागा निर्माण करणे गांभीर्याने व तातडीने आवश्यक गरजेचे आहे. यासाठी आत्तापासूनच शेतीचे नियोजन आणि शेतकऱ्यांचे प्रबोधन-जागृती करणे गरजेचे असल्याचे हवामान शास्त्रज्ञ प्रा. किरणकुमार जोहरे यांनी सांगितले आहे. सूर्यावर निर्माण झालेल्या वादळी परिस्थितीमुळे वैश्विक किरणे पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रावर आदळल्याने पृथ्वीच्या वातावरणात खळबळ झाली, परिणामी क्युम्योलोनिंबस ढगांची निर्मिती होत असल्याने ढगफुटी होत आहे. वातावरणात तयार झालेल्या भोवऱ्यांमुळे जुलै महिन्यात 'रेकॉर्ड ब्रेक' पाऊस झाला. नोव्हेंबर नंतर देखील महाराष्ट्रासह भारताच्या बहुतांश भागात मोठा पाऊस पडणार असल्याने सर्व धरणांच्या पाण्याचे नियोजन करण्याची गरज असल्याचेही प्रा. किरणकुमार जोहरे यांनी सांगितले आहे.

# प्रहार ने सुचविलेले सर्व रस्ते तातडीने दुरुस्ती करण्याचे जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र भोसले यांचे आदेश..

## प्रहारच्या मागणीची दखल न घेणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

राहुरी प्रतिनिधी - प्रहारने सुचविलेले सर्व रस्ते तातडीने दुरुस्त करण्याचे रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ राजेंद्र भोसले यांनी आदेश दिले या बैठकीत प्रहारच्या मागणीची दखल न घेणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना डॉ. राजेंद्र भोसले जिल्हाधिकारी यांनी फैलावर घेतले.

या बैठकीत जिल्हाधिकारी यांचे सकारात्मक निर्णयामुळे प्रहार चे सा. बा. समोरील सदबुद्धी सत्यनारायण जागरण गोंधळ तूर्तास स्थगित केले असल्याचे प्रहारचे जिल्हाध्यक्ष अभिजीत दादा पोटे यांनी सांगितले.

जिल्ह्यातील रस्त्यांची दयनीय अवस्था आणि त्यावर होणारे अपघाताचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने वारंवार विनंती अर्ज करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग दखल घेत नसल्याने प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अहमदनगर येथील कार्यालयाच्या समोर सद्बुद्धी सत्यनारायण व जागरण गोंधळ कार्यक्रम घेणार असल्याचे जिल्हाध्यक्ष अभिजीत दादा पोटे यांनी निवेदन दिले होते.

त्या निवेदनाची दखल घेऊन जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी त्यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जिल्हा रस्ते सुरक्षा समितीची आज बैठक बोलावली होती त्या बैठकीमध्ये बोलताना जिल्हाध्यक्ष अभिजीत दादा पोटे यांनी जिल्ह्यातील विविध रस्त्यांचे प्रश्न उपस्थित केले त्यांचे सोबत बैठकीस प्रहारचे श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष अप्पासाहेब ढूस, जिल्हा कार्याध्यक्ष नवाज शेख, प्रहार किसान आर्मीचे प्रमुख रघुनाथ आरगडे, रमेश भालके, नानासाहेब तागड, पाथरवाल्याचे सरपंच दत्तात्रय खाटीक आदी प्रहार कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

प्रहार ही सामाजिक कार्यात आग्रह धरणारी जिल्ह्यातील एकमेव संघटना आहे त्यांच्या निवेदनाचा विचार होत नसेल तर ते चुकीचे आहे.
जिल्हाधिकारी डॉक्टर राजेंद्र भोसले...

या बैठकीमध्ये बैठकीचे अध्यक्ष जिल्हाधिकारी डॉ. राजेंद्र भोसले यांनी बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता कुलकर्णी यांनी प्रहारच्या निवेदनावर तात्काळ दखल न घेतल्याबद्दल ताशेरे ओढले तसेच प्रहार ही सामाजिक कार्यात आग्रह धरणारी जिल्ह्यातील एकमेव व अग्रगण्य संघटना असून त्यांच्या निवेदनाचा विचार होत नसले तर ते चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले.



पुढे बोलताना जिल्हाधिकारी साहेब म्हणाले की जिल्ह्यातील महत्त्वाच्या रस्त्यांपैकी नगर मनमाड रस्त्याचे टेंडर निघाले असून लवकरच त्याचे काम सुरू होणार आहे त्याबद्दल काल मंत्रालयात बैठक संपन्न झाली असून एक महिन्यात हा प्रश्न मार्गी लागणार आहे तसेच पाथर्डी चा प्रस्तावही एक महिन्यात मार्गी लागेल प्रहारच्या तक्रारींवर तात्काळ निर्णय करण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना आदेश देऊन रोड सेफ्टी चे सर्व नियम पाळण्यास सांगितले तसेच गॅस पाईपलाईन कामाची चौकशी करून ते नियमात कामे होतात किंवा कसे हे पाहण्याचेही जिल्हाधिकारी साहेब यांनी आदेश दिले त्याचबरोबर रस्त्याचे डिव्हायडर फोडल्याबद्दल संबंधितांवर तात्काळ कारवाई करून त्या डिव्हायडरची दुरुस्ती करण्याचे आदेशही या ठिकाणी जिल्हाधिकारी साहेबांनी दिले असता जागतिक बँक प्रकल्प विभागाचे कार्यकारी अभियंता राजगुरू यांनी ही बाब आमच्या कक्षेत येत नसल्याचे सांगितले असता जिल्हाधिकाऱ्यांनी जे डाबी चालक पेट्रोल पंप चालक किंवा इतर उद्योजक कुठलीही परवानगी न घेता अवैधरीत्या डिव्हाइडर फोडतील तर त्यांच्या समोरील रस्ता खोदण्याचे आदेश राजगुरू यांना दिले

या बैठकीमध्ये श्रीरामपूर विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष आप्पासाहेब ढूस यांनी देवळाली प्रवरा ते टाकळीमिया या रस्त्याचे काम संदर्भात मुद्दा उपस्थित करून निवेदन दिले असता त्यावर जिल्हाधिकारी साहेब यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास प्रहारच्या मागणीतील सर्व रस्त्यांच्या बाबत तातडीने बैठक घेऊन निर्णय करण्याचे आदेश दिले आहेत. जिल्हाध्यक्षांनी राहता श्रीरामपूर तालुक्यातील सीमेवरील वाकडी फाटा ते गणेश नगर एकरुखे हा रस्ता जिल्हा परिषदे कडून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नाशिक येथील कार्यालयाला सतत पाठपुरावा करून मंत्रालयातील रस्ते सचिवांकडे पाठवला असून दोन वर्ष होऊनही हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग केला जात नसल्याची बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता कुलकर्णी यांच्या लक्षात आणून दिली नेवासा तालुक्यातील एकूण पंधरा रस्त्यांचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवून अवधी होऊन गेला मात्र नवीन रस्ते किंवा झालेल्या रस्त्यांना तीन-चार महिन्यातच खड्डे पडले असता त्या रस्त्यावर वृक्षारोपण केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने खडबडून खड्डे बुजवण्यास सुरुवात केली असल्याची बाब सुरक्षा बैठकीत समोर मांडली नेवासा तालुक्यातील रस्ते व राहता तालुक्यातील वाकडी रस्ता कुलकर्णी यांनी रस्ता तातडीने वर्ग करून घेत असल्याचे सांगितले

बाभळेश्वर श्रीरामपूर नेवासा रस्त्याच्या निकृष्ट कामाबाबत संबंधित श्रीरामपूरचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अधिकारी नितीन गुजरे यांना रस्त्याच्या चालू असलेल्या निकृष्ट कामाबाबत विचारणा करून रस्त्याच्या निविदेची मागणी केली असता त्यांनी कुठलीही माहिती न देता मी आमदाराचा नातेवाईक असल्याची बतावणी करत असल्याची बाब श्री नवाज शेख प्रहार चे जिल्हा कार्याध्यक्ष व प्रहार श्रीरामपूर विधानसभा प्रमुख आप्पासाहेब ढूस यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली असता जिल्हाधिकारी महोदय यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अध्यक्ष अभियंता कुलकर्णी यांना यापुढे असा प्रकार खपवून घेतला जाणार नाही संबंधित अधिकाऱ्यांला समज देण्याची बतावणी केली.

# सेलू येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या –नाभीक समाजचे निवेदन

**वडवणी । वार्ताहार**
सेलू येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यांना फाशी द्या या मागणीसाठी वडवणी तहसील येथे नाभिक समाजासह सामाजिक व राजकीय संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे केली मागणी



सेलू जिल्हा परभणी येथील नाभिक कुटुंबातील अकरा वर्षाची मुलगी व तिच्या मावस भावाला सेलू येथुन अपहरण करून गाडीवर बसून बोरी तालुका जिंतूर जिल्हा परभणी येथे दोन नराधमांनी आणले व मुलाला कोसडी फाटा बोरी येथे सोडून देऊन मुलीला कोक शिवारात घेऊन अत्याचार करून पसार झाले

सदर ही घटना माणुसकीला काळीमा फसणारी आहे नाभिक समाजातील मुलीवर झालेल्या अत्याचाराबाबत समाजातील सर्व बांधवांनी तहसीलला या निवेदन केले की सदर नराधमावर पोक्सो कायदा व बाललैंगिक प्रतिबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करून सदर प्रकरणात जलद न्यायालयात खटला चालून सदर खटल्या कामी विशेष सरकारी वकील म्हणून अॅड. उज्वल निकम यांची नियुक्ती करावी सदर पीडित मुलीच्या कुटुंबास प्रशासनाकडून ताबडतोब आर्थिक मदत करावी सदर घटनेने नाभिक समाजातच नव्हे तर सर्व समाजातील जनतेमध्ये संताप निर्माण झाला आहे सदर प्रकरणांचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा द्यावी अशी सर्व समाजातून मागणी होत आहे सदर या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपीवर कठोर कारवाई करण्यात यावी अन्यथा नाभिक समाज बांधव संपूर्ण महाराष्ट्र व्यापक आंदोलन करेल असे निवेदनाद्वारे महाराष्ट्र नाभिक महामंडळ वडवणी तालुक्याच्या वतीने वडवणी तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस यांना निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली.

यावेळी महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे मराठवाडा अध्यक्ष युवराज शिंदे, बाजार समितीचे माजी संचालक गुलाब भाऊ राऊत ,शिवसेनेचे माजी तालुकाप्रमुख विनायक बाप्पा मुळे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, वडवणीचे नगरसेवक भीमराव उजगरे, महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे नेते परमेश्वर राऊत, ओबीसीचे नेते दत्ताभाऊ वाकसे, गौतम दादा भालेराव मित्र मंडळाचे अध्यक्ष बाबासाहेब साळवे, वसंतराव बहिरे अशोक बहिरे, कॉ लहू खरगे, संतोष काळे, सारंग चव्हाण, विष्णू टकले ,भागवत शिंदे, माऊली राऊत, संतराम राऊत, कृष्णा शिंदे, कृष्णा काळे, नारायण खाडे, सिद्धेश्वर काळे, रामेश्वर काळे, विलास झेंडे, दादा अंबुरे यांच्यासह राजकीय सामाजिक क्षेत्रातील पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेश नगरच्या गणेश मंडळांच्या वतीने सर्वधर्म समभाव निर्माण करून एकतेचा संदेश; अनाथ मुलाला गणवेश तर विधवा महिलांना साठी वाटप

**तलवाडा । वार्ताहार**
गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गणेश नगर भागातील गणेश नगरचा राजा या मंडळांनी प्रत्येक समाजातील व्यक्तींना बोलून एकतेचा संदेश उपक्रम राबवून समाजात आपसात तेड निर्माण होऊ नये

यासाठी जातीय सलोख्याचे वातावरण निर्माण केले याची ताजा उदाहरण या गणेश नगरचे गणेश मंडळाच्या वतीने एकोपेचा संदेश देणारा एक छोट्या खाणी कार्यक्रम ठेवण्यात आला होता या कार्यक्रमाला गावातील सर्व लोकप्रतिनिधी उपस्थित होते यावेळी तलवाडा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक बाळासाहेब भवर, माजी जि,प, सदस्य अँड सुरेश हात्ते, उपसरपंच आक्रम सौदागर, प्रा शाम कुंड, विजय डोंगरे सर, प्रमोद डोंगरे सर,



नवनाथ पवार सर, पुजाताई मोरे, रूशी करंडे, यांनी मनोगत व्यक्त केले,

तलवाडा पोलीस स्टेशनचे गोपनीय शाखेचे पोलिस कर्मचारी रामेश्वर खंडागळे, यावेळी संत रविदास प्रतिष्ठान संस्थापक तुळशिराम वाघमारे,समता परिषद गेवराई तालुकाध्यक्ष बापु गाडेकर,पत्रकार आल्ताफ भाई कुरेशी, शेख आफसर भाई, शेख खलील मामु,खाजा कुरेशी, शेख रफिक, साहेबराव कुराडे,मदन हाताळले, सुनील नाटकर, कावळे टेलर, शेख इम्रान,सऊद सौदागर,आसलम सौदागर, सुरेश शिंदे,वसीम सौदागर,खिजर सौदागर,बाळु शिंणगारे,राहुल डोंगरे, तसेच पुरुष – महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते

# विनायक भोसले यांनी नीट परीक्षेतील यश कौतुकास्पद–डॉ. संतोष मुंडे

**परळी वैजनाथ । वार्ताहार**
तालुक्यातील सेलू येथील विनायक भोसले यांनी नीट परिक्षेत यश संपादन केले त्याबद्दल सत्कार राष्ट्रवादी युवक प्रदेश उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला.दरम्यान अंगी जिद्द व चिकाटी असेल तर आर्थिक स्थिती अडसर ठरत नाही याचा प्रत्यय विनायकने समाजासमोर ठेवला आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत परिस्थिती मिळवलेले यश कौतुकास्पद असल्याचे डॉ.संतोष मुंडे यांनी सांगितले.

विनायक अर्जुन भोसले रा.सेलू ता. परळी. याच्या वडिलांचे सन–२०१४ मध्ये अपघाती निधन झाले. पतीच्या निधनानंतर खचून न जाता विनायकाची आई सुनीता यांनी लोकांच्या घरची धुनी–भांडी करून मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात ठेवले. त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे. मुलांच्या शिक्षणासाठी सुनीताबाई यांनी अंबाजोगाई गाठले. आर्थिक स्थिती हालाखीची असल्याने त्यांनी अंबाजोगाईत धुणे–भांडी करण्याचे काम सुरू केले. व एकाच छोट्याशा भाड्याच्या खोलीत हे चारजनांचे कुटुंब राहते.याच ठिकाणी सर्वजण एकत्रित अभ्यास करतात.



विनायक याचे दहावीचे शिक्षण माजलगाव येथे झाले. दहावीत असताना तो स्वतः म्हशी चा सांभाळ करून दूध वाटप करून आईला आर्थिक हातभार लावत असे. मात्र अंबाजोगाईत चांगले शिक्षण असल्याने भोसले कुटुंब इथे स्थायिक झाले. विनायक ची आई सुनीताबाई कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आजही लोकांची भांडी घासतात.आईचे कष्ट व आर्थिक परिस्थिती याची जाणीव ठेवून विनायकने डॉक्टर होण्याची जिद्द मनात बाळगली.नीट च्या शिकवणीची फिस भरू शकत नसल्याने त्याने यूट्यूब वर अभ्यासक्रमाचे व्हिडीओ पाहून मेहनतीने अभ्यास केला.व नीट च्या परीक्षेत ५९५ गुण प्राप्त केले. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत विनायकने जिद्दीने यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल शनिवार, दि.१० सप्टेंबर रोजी परळीत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. संतोष मुंडे यांच्या हस्ते विनायक भोसले यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.परळी सारख्या ग्रामीण भागातून अथक परिश्रमाच्या बळावर विद्यार्थी घवघवीत यश संपादन करत आहेत.परळी शहरातही अनेक शैक्षणीक संस्था विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य करत आहेत.परळी शहर व परिसरातुन घडत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या उज्वल यशासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करु असेही डॉ.संतोष मुंडे यांनी यावेळी सांगितले. सत्कार प्रसंगी माजी सरपंच पद्माकर शिंदे,वचिष्ठ मुसळे, एकनाथ शिंदे , अशोक देशमुख व इतर उपस्थित होते.

# शंभूराजे गणेशोत्सव मंडळाचे विविध उपक्रम; रक्तदान शिबीरात अनेकांचा सहभाग

**परळी । वार्ताहार**
गणेशोत्सव २०२२ निमित्त तालुक्यातील मौजे पिंपरी बु. येथे शंभूराजे गणेशोत्सव मंडळाच्या वतीने विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. बुधवारी दुपारच्या सत्रात रक्तदान शिबीर आयोजित केले होते, यात अनेकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवाला. तर सायंकाळच्या सत्रात शाहीर रामानंद उगले यांच्या जल्लोषपूर्ण शाहिरीने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

भाजपा किसान सभेचे राज्य सदस्य उत्तम दादा माने व भाजपा तालुका सरचिटणीस सुरेश माने, रमेश पौळ यांच्या मार्गदर्शनाखाली शंभूराजे गणेश मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाकडून विविध लोकोपयोगी व सांस्कृतिक कार्यक्रम गावात राबविण्यात येत आहेत. बुधवारी रक्तदान शिबिरासह शाहीर रामानंद उगले यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उदघाटन प्रसंगी भाजपा तालुकाध्यक्ष सतीश मुंडे, उत्तम दादा माने, भाजपा तालुका सरचिटणीस सुरेश माने, सरपंच माऊली साबळे, चंद्रकांत देवकते, पत्रकार दत्तात्रय काळे, महादेव शिंदे, जनहित बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे चेअरमन अनिल माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.



शाहिरी, गोंधळ, भारूड, गवळण, वग हे लोकगीताचे प्रकार प्रबोधनकारी असून आजच्या पिढीला महाराष्ट्राची लोकसंस्कृती जपवणारे हे कार्यक्रम कळावेत आणि त्यांच्यात ते रुजावेत यासाठी शंभूराजे गणेश मंडळाने आयोजित केलेला कार्यक्रम कौतुकास्पद असल्याचे मत शाहीर रामानंद उगले यांनी व्यक्त केले. देशाच्या लोकसंस्कृतीला टिकवणारा एकमेव महाराष्ट्र असून, लोकचळवळी, लोकसंस्कृतीची या राज्याने जोपसणूक केली आहे. छत्रपती शिवरायआणि संभाजी महाराजांची प्रेरणा या राज्याला सतत दिपस्तंभप्रमाणे मार्गदर्शक ठरणारी असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांचे स्वागत शंभूराजे गणेश मंडळाचे अध्यक्ष दादा पठाण, ग्रामपंचायत सदस्य दादकिसन औटे, रवी माने, धीरज माने, रणजित पालकर, सुशांत पौळ, कुंडलिक चोपडे यांच्यासह मंडळाच्या सदस्यांनी केले. मोठ्या संख्येने ग्रामस्थ कार्यक्रमाला उपस्थित होते.




